**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ३०/०९/२०२२

## दि.२९/०९/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण (महाळुंगे) १५४३/२०२२ भा.द.वि.क.३९९,४०२

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २९/०९/२०२२ रोजी ०१:१५ वा चे सुमारास मौजे कुरुळी ता.खेड जि.पुणे गावचे हद्दीत सॅनी कंपनी ते मुंगी कंपनी मार्गे कुरुळी गावाकडे जाणारे रोडलगत अॅक्युब कंपनीचे जवळील मोकळे जागेमध्ये

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी ०४.२६ वा.

फिर्यादी :- विठ्ठल चिंतामन वडेकर, पो.ना.ब.नं.२४७१, महाळुंगे पोलीस चौकी, पिंपरी-चिंचवड

आरोपी :- १)रोहन मोहन शिंदे वय २१ वर्षे रा सिध्दीविनायक नगर मेदनकरवाडी चाकण ता.खेड जि पुणे
२)बालाजी संभाजी फत्तेपुरे वय १९ वर्षे रा.बिरदवडी प्रार्थमिक शाळेजवळ आंबेठाण ता. खेड जि पुणे, मुळ राहणार मु पो भातांगळे ता लोहारा जि धाराशिव (उस्मानाबाद),
३)संदेश दत्ता जगताप वय १९ वर्षे रा.बिरदवडी प्रार्थमिक शाळेजवळ आंबेठाण ता. खेड जि पुणे कायमचा पत्ता - मु पो भातांगळे ता लोहारा जि.धाराशिव (उस्मानाबाद)
४)सनी, पुर्ण नाव पत्ता माहिती नाही.
५)बबलु पुर्ण नाव पत्ता माहिती नाही.
**आरोपी क्र १ ते ३ अटकेत**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ ते ५ असे एकत्र जमुन कुरुळी गावचे हद्दीतील एच.पी.पेट्रोल पंपावरील कॅश लुटण्याकरीता अगर कंपनीमधुन कामावरुन सुट्टी झालेले कामगार रोडने एकटा जाताना दिसुन आल्यास त्यास अडवुन लुटण्याचे तयारी असताना मिळुन आले असुन त्यांचेकडे एक लोखंडी कोयता, एका कागदामध्ये मिरची पुड, एक लोखंडी रॉड, दोन मोबाईल फोन, एक लोखंडी कटावणी असे एकुण १७,८९५/- रुपये किंमतीचे साहित्य मिळाले त्यांना ताब्यात घेत असताना त्यांचे पैकी आरोपी क्र ४ व ५ हे अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले आहेत. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जाधव ९७६६०३७६२३

२.

पोस्टे व गु.रजि.नं. :- देहुरोड ६१०/२०२२ भादविक ३७६,४०६,४२०,१२०ब प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १० जुलै २०२१ पासुनते ०६/०१/२०२२ रोजी च्या दरम्यान देहुरोड मामुर्डी येथेजाणारे रोडवर वडाचेझाडा जवळ

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी ००.१० वा.

फिर्यादी :- पीडीत महिला फिर्यादी वय- ३३ वर्षे,

आरोपी :- १)प्रदिप फक्कड कोळी वय ३० वर्षे रा तळेगाव दाभाडे ता.मावळ, जि पुणे,
२)अंकुष सोनवणे,
३)देवा विलास सोनवणे वय ३२ वर्षे रा पवनानगर मावळ, जि पुणे
**आ.क्र.१ व ३ अटक आहे**

तपशिल :- दि. ०६/०१/२०२२ रोजी अंकुष सोनवणे व प्रदिप कोळी हे फिर्यादीचे घरी आले व म्हणाले की पवनानगर काळे

येथील जमिन ही चांगली आहे तुम्ही ती घ्या असे सांगितले. त्यावेळी प्रदिप कोळी हा फिर्यादीस म्हणाला की आपल्या मध्ये जे काही झाले ते कोणाला सांगु नकोस जर कोणाला सांगीतले तर तुझे मुलीला व तुला गायब करेन तुमचे पुढे व पाठी दुसरे कोणी नाही व तुझा सर्व एफ.डी.हया मोडून जमिनी मध्ये गपचुप गुतवणुक कर, असे सांगितले असता फिर्यादी यांनी एफ.डी.मोडून जमिनीमध्ये गुंतवले. जानेवारीच्या शेवटच्या आठवडयात जेव्हा सात बारा आला तेव्हा फिर्यादी अंकुष सोनवणे यांचे घरी गेले व विचारले की मला जमिनी एका ठिकाणच्या दाखवल्या व दिल्या दुस-या असे का, तेव्हा ते मला म्हणाले की त्यांना सदर बाबत काहीएक माहिती नाही असे सांगितले व सर्व काही प्रदिप कोळी पहात असले बाबत सांगितले त्यानंतर प्रदिप कोळी हा सारखा फिर्यादीचे धानोरी येथील घरी येत होता व फिर्यादीस लग्न करणेसाठी व राहते घर त्याचे नावावर करणेकरीता सारखी धमकी देत होता व फिर्यादीसोबत जबरदस्तीने शारिरीक संबध करीत होता. १० जुलै २०२१ पासुन ते ०६/०१/२०२२ रोजी च्या दरम्यान प्रदिप कोळी, देवा सोनवणे, अंकुष सोनवणे यांनी मिळुन फिर्यादीची वेळोवेळी संगणमताने कट करून फसवणुक करून फिर्यादीकडून विश्वासाने ६६,००,०००/- रूपयेची जमीनीच्या व्यवहारात फसवणुक करून प्रदिप कोळी याने दि. ०५/०१/२०२२ रोजी १.३० ते २.०० वा. देहुरोड मामुर्डी येथे जाणारे रोडवर वडाचे झाडाजवळ गाडी लावली व फिर्यादीचा हात पकडून म्हणाला की मला तु खुप आवडतेस मला तुझेशी लग्न करायचे आहे, फिर्यादीचे तोंड जोरात दाबले व फिर्यादी सोबत जबरदस्तीने शारीरिक संबध केला फिर्यादी या घरी एकटी असल्याने भीतीने तक्रार देण्यासाठी आल्या नव्हते परंतु आज रोजी माझी मानसिक तयारी झाल्याने गुन्हा दाखल

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गावडे ९७६९९००५७७

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चिंचवड ४६२/२०२२ भादवी कलम ३७६(२)(न),३२३,५०४,५०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- सन २०१७ पासुन ते २०/०९/२०२२ पर्यंत वेळोवेळी राजयोग कॉलनी, कोळीवाडा हॉटेलजवळ वाल्हेकरवाडी येथे एका भाडयाचे रुममध्ये फिर्यादीचे राहते घरी

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी २३.३४ वा.

फिर्यादी :- पीडीत महिला फिर्यादी वय ३१ वर्ष

आरोपी :- राजेंद्र शेषेराव शिंदे वय ४२ वर्ष रा.खंडोबा मंदीराजवळ,पुनावळे
**आरोपी ताब्यात आहे.**

तपशिल :- सन २०१७ ते दि २०/०९/२०२२ रोजी पर्यंत आरोपीत याने फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन वारंवार फिर्यादीची इच्छा नसताना बळजबरीने शरीरसंबंध करुन फिर्यादी यांना हाताने मारहाण करुन शिवीगाळ करुन फिर्यादीस जर पोलीसात तक्रार केली तर मारुन टाकण्याची धमकी दिल्याने गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि राजेश मोरे ९८५०४८२०२०

४.

पोस्टे व गु.रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ५८७/२०२२ भा.द.वि कलम ३२४,३२३,१४३,१४७,१४९,५०४,५०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २९/०९/२०२२ रोजी ०९/३० वा. चे सुमारास सस्ते पाटील नगर मोशी पुणे जमिन गट नंबर २४४ मध्ये

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी २१.४७ वा.

फिर्यादी :- गोरखनाथ बाळासाहेब सस्ते वय ३९ वर्षे रा.सस्तेनगर, दुर्वापार्क शेजारी मोशी पुणे

आरोपी :- १)विष्णु बाबुराव सस्ते वय ५५ वर्षे
२)शिवाजी बाबुराव सस्ते वय ५७ वर्षे
३)दिंगबर शिवाजी सस्ते वय ३४ वर्षे

४)अक्षय उर्फ आकाश विष्णु सस्ते वय २६ वर्षे
५)रविंद्र मारुती सस्ते वय ४५ वर्षे सर्व रा.सस्तेनगर, दुर्वापार्क शेजारी मोशी
**अटक नाही.**

तपशिल :- नमुद ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे स्वताचे मालकीचे जमिन गट नंबर २४४ मध्ये असताना फिर्यादी यांनी सुलोचना पवार याचे १५ गुंठे क्षेत्र खरेदी का केले याचा राग मनात धरुन आरोपीत यांनी बेकायदेशिर जमाव जमवुन फिर्यादी मजकुर तसेच त्याचे वडील बाळासाहेब दशरथ सस्ते, पत्नी श्वेता गोरखनाथ सस्ते व वहीनी विजया तानाजी सस्ते यांना वाईट वाईट शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली तसेच विष्णु बाबुराव सस्ते व दिंगबर शिवाजी सस्ते यांनी त्याचे हातातील काठीने फिर्यादी याचे वडील बाळासाहेब दशरथ सस्ते याचे दोन्ही हातावर व छातीवर मारहाण करुन तु जागा कशी खरेदी करतो असे म्हणुन मारण्याची धमकी देवुन जखमी केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा ७४९ के एस कदम, ८३८००८१९५६

५.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चिखली ५१४/२०२२ भा.द.वि.क.३७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २८/०९/२०२२ रोजी २१/०० वा. दरम्यान ते २९/०९/२०२२ रोजी ०६.३० वा. राहुल ताम्हाणे, हनुमान सोसायटी म्हेत्रेवस्ती चिखली पुणे चे समोरील

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी १३/२४ वा.

फिर्यादी :- गिरीष गोविंद इतापे, वय २६ धंदा- रिक्षा चालक रा.सी/ओ.राहुल ताम्हाणे, हनुमान सोसायटी म्हेत्रेवस्ती चिखली पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांची ९०,०००/- रुपये किंमतीची टिव्ही एस कंपनीची रिक्षा हि त्यांचे घरासमोर हॅन्डल लॉक करुन पार्क केली होती. ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/११३३ साकोरे ९५८८६९८१५४

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चाकण (महाळुंगे) १५४२/२०२२ भा.द.वि.कलम ३८० प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १९/०९/२०२२ रोजी २०/४५ ते २०/०९/२०२२ रोजी ०८/३० वा चे दरम्याण मौजे महाळुंगे ताखेड जि पुणे गावचे हद्दीत बी एम डी इंजिनेअरींग प्रा. लि. या कंपनीमध्ये

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी ०२.३५ वा

फिर्यादी :- गोकुळ ज्ञानेश्वरभिसे वय २९ वर्षे रा. आंबेठाण शुभम रेसिडंसी ता.खेड जि पुणे

आरोपी :- **अज्ञात चोरटा**

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी १४,०४,५००/- रु.किं.चे लहान-मोठे स्टेनलेस स्टिलचे १०७ तयार झालेले जॉब फिर्यादी कंपनीत नसल्याचा फायदा घेवुन कंपनीचे पाठीमागील बाजुस असलेल्या उघडे पत्र्याचे शेडमधुन जावुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीशिवाय, स्वताःचे आर्थिक फायदयासाठी लबाडीचे इरादयाने, चोरुन नेलेला आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि किरण शिंदे महाळुंगे ७५०६९७४७९०

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १५४०/२०२२ भादवि का क ३०४(२),२७९, ३३७,३३८ मोवाकाक १८४,१३४/१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २८/०९/२०२२ रोजी २१/३० वा चे सुमारास हॉटेल रानवारा आंबेठाण रोड चाकण ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी ०१/४१ वा |
| फिर्यादी | :- | विराज विलास पाटोळे वय २४ वर्षे रा.साई साम्राज्य सोसायटी आंबेठाण रोड चाकण ता खेड जि पुणे |
| आरोपी | :- | बस क्र. एम एच १२ डी टी ९०१६ या बसवरील चालक अनिल कैलास यादव वय २५ वर्षे बाळु भोयटे याचे खोलीत भाड्याने गणेशनगर मेदनकरवाडी बालाजीनगर चाकण ता खेड जि पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची आई नामे वंदना विलास पाटोळे वय ४४ वर्षे रा साई समुध्दी सोसायटी आंबेठाण रोड चाकण ता खेड जि पुणे हि चालवत असलेल्या डिवो स्कुटी नं एम एच १४ डी के ३०६९ हिस पाठीमागुन बस नं एम एच १२ डी टी ९०१६ या बसवरील चालकाने चाकण कडुन आंबेठाण गावाकडे जात असताना धडक देवुन गंभीर जखमी करुन तिचे मुत्युस कारणीभुत झाला व अपघाताची खबर न देता गाडी तेथेच सोडुन पळुन गेला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि बामणे ९६३७६४६५४७ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९३५/२०२२ भां.दं.वि कलम- ३६७, ३२६, ३२३, ३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २८/०९/२०२२ रोजी १८/०० वाजल्यापासुन ते २१/०० वाजण्याचे दरम्यान मधुबन हॉटेलजवळ, ॲटलांटा सोसायटी समोर, हिंजवडी पुणे येथे असणारे भंगार दुकानाचे समोर. |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी ०५.३२ वा |
| फिर्यादी | :- | जैशमोहम्मद अब्दुलरहीम सिध्दीकी वय-२६ वर्ष, रा-स्पाईन रोड, मधुबन हॉटेलजवळ, ॲटलांटा सोसायटी समोर, हिंजवडी पुणे मुळगांव- ग्राम-मौनार,पो करही तह-इटवा, जि-सिध्दार्थनगर, राज्य-उत्तरप्रदेश |
| आरोपी | :- | १)दत्ता काळकुटे २)नागेश काळकुटे ३)कुष्णा काळकुटे ४)शाकीर शेख वय अंदाजे-२० ते २५ वर्ष रा-वारजे पुणे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे मधुबन हॉटेलजवळ, ॲटलांटा सोसायटी समोर, हिंजवडी पुणे येथे भंगार दुकानाचे शेजारी बसलेले असताना भंगार दुकानाचे शेजारी असणारे हॉटेलमध्ये फेब्रिकेशनचे काम करणारे चार मुले यांनी "तुने मेरे गाडी में रखी हुई जर्मल का सीढी लेके गया हैं, वो सीढी हमारा दे दो," असे म्हणुन सीढी घेतलेचे संशयावरुन फिर्यादी यांना रागाचे भरात जबरदस्तीने हाताने मारहाण करुन चॉकलेटी रंगाचा टिशर्ट घातलेले मुलाने " ये चल बैठ टेम्पो में, मैं खुद सीढी ढुंडके देता हुँ "असे म्हणुन हाताने मारहाण करुन जबरदस्तीने अपहरण करण्याचे उददेशाने टेम्पोमध्ये घालुन वारजे या ठिकाणी असणारे आरोपी यांचे फेब्रिकेशनचे शॉपवर घेवुन जावुन सदर ठिकाणी लोखंडी रॉडने डोक्यावर, हातावर, पाठीवर मारहाण करुन जबर दुखापत करुन जखमी केले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जी.बी. खारगे. ९०११००२३३३ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | निगडी ६९९/२०२२ भा. द. वि. कलम ३६३ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २९/०९/२०२२ रोजी ०५.४५ वा. संगमित्रा हौ.सोसा.बी.न.ए-२२ रूम नं.२०९ से.न.२२ निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी १८/२३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय ६५ वर्ष, |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | नमुद ता.वेळ व ठिकाणी फिर्यादी यांची अल्पवयीन नात(मुलाची मुलगी) वय १६ वर्षे २ महिणे हिस कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन ती अल्पवयीन असल्याचे माहीत असतांना कशाचेतरी अमीष दाखवुन फुस लावुन पळवुन नेले आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गिरीगोसावी ९४०३६०४८२६ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ७९३/२०२२ भा.द.वि.कलम ३६३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २४/०९/२०२२ रोजी १४:३० वा. चे सुमारास आळंदी रोड, जय महाराष्ट्र चौक, सकुबाई गार्डन जवळ, वसंत ईलेक्ट्रॉनीक समोर, भोसरी पुणे येथील माझे राहते घरातुन |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी १४.५२ वा. |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी, वय ७२ वर्ष, |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची अल्पवयीन नात वय १७ वर्ष हीस कोणीतरी अज्ञात इसमाने, फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतुन अज्ञात कारणाकरीता फुस लावुन पळवुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पवार ९५५२५८०५२६ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ४३५/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४, माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ऑगस्ट २०२२ पासुन आजतागायत फिर्यादी व आरोपी याचें राहते घरी. |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी १८/०० वा |
| फिर्यादी | :- | रणजित महादेव ढोमसे, वय- ४० वर्षे, रा. फ्लॅट नं. ५०३, विंग -ए, कृष्णाई विहार, पी.सी.एम.सी. गार्डनजवळ, नवी सांगवी, पुणे. |
| आरोपी | :- | १)रोहन शहा, २)राहुल मेहरा<br>**अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी १ व २ यांना SR Trades LTD Live कंपनीनीने Trade4bills.com या वेबसाईटच्या माध्यमातुन गुंतवणुकीवर ४० टक्के परतावा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन विश्वास निर्माण करुन टप्याटप्याने २३ लाख रुपये गुंतवणुक करण्यास भाग पाडले त्यानंतर गुंतवणुकीचा परतावा देण्याचे वेळी त्याचा विश्वासघात करुन कोणतोही परतावा न देता व गुंतवणुक केलेली रक्कम न देता आरोपींनी स्वतःच्या फायद्यासाठी इलेक्टॉनिक व इंटरनेट माध्यमाचा वापर करुन फिर्यादी यांची आर्थीक फसवणुक केली |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि सुनिल तांबे ९८२३०७९८५२ |

१२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ७००/२०२२ भा द वि कलम ४२० ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ३०/०९/२०२० रोजी २७/०९/२०२१ रोजी कालावधी दरम्यान अवनिरा बायोटेक कंपनी कायनेटीक कॉम्पलेक्स, गरवारे कंपनीसमोर, चिंचवड |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी १९/२० वा |
| फिर्यादी | :- | डॉ.विकास अज्ञितऐच वय ५० वर्ष व्यवसाय-लॅब टेस्टींग रा.ठी.ए ११, श्री भगवतीनगर पाषाण, पुणे २१ |
| आरोपी | :- | १)श्री चोलन मुदलीयार २)श्री जयशंकर पुर्णनाव व पत्ता माहीती नाही.<br>**अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी श्री विकास ऐच यांना त्यांची कंपनी अवनीरा बायोटेक कंपनी, कायनेटीक कॉम्पलेक्स गरवारे कंपनीसमोर, चिंचवड पुणे या कंपनीचा व्यवसाय वाढीकरीता लोनची आवश्यकता होती. यातील आरोपीत १ व २ त्यांनी लोन मंजुर करुन देतो असे खोटे आश्वासन देवुन फिर्यादी यांचेकडुन ४ लाख रुपये घेवुन कर्ज मंजुर न करता, कर्ज मंजुरी करीता घेतलेली ४ लाख रुपये रक्कम स्वता करिता ठेवुन फसवणुक केली आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि दत्तात्रय मोरे ९४२०९३८६९३ |

१३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ८२५/२०२२ भा.द.वि.कलम ४२०,४०६,५०७, ३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०४/०५/२०१९ पासुन ते आज पर्यत कुणाल हॉटेल चे बाहेर काळेवाडी पुणे, डांगे चौक वाकड पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी १५.२८ वा |
| फिर्यादी | :- | अनिल शरद अहिरराव वय ४९ वर्षे रा. सी -विगं फ्लॅट नं २०३ रागा होम्स नेवाळे वस्ती आकुर्डी चिखली रोड चिखली पुणे. |
| आरोपी | :- | १)बालाजी बळीराम घोडके वय अंदाजे ३२ वर्षे रा. यवत पोलीस स्टेशन मागे ता. दौंड, जि. पुणे<br>२) संग्राम यादव वय अंदाजे ४५ वर्षे रा. कोल्हापूर<br>३) बालाजी फायनान्स चे मालक मुजावर रा.जयहिंद पार्क, न्युट्रिफिल प्रशांत टायर, कसबा बावडा रोड कोल्हापूर<br>**अटक नाही.** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी सर्वानी संगनमत करुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन २,६५,०००/- रु ची फसवणुक केली आहे. तसेच फिर्यादीचे सही केलेले सात कोरे चेक कोटक महिंद्र बँक टिळक रोड शाखा पुणे घेतले आहेत. फिर्यादी सारखे अनेक लोकांची त्यांनी लोन देतो म्हणुन फसवणुक केली आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि आर.आर. दिवटे, ८६०५१५७१५७ |

१४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ८२६/२०२२ भा.द.वि.कलम ४२०,३४ भादंवि. सह कलम ३, ७, १०, ११, १३ व १४ मोफा. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २००५ पासुन अद्यापपर्यंत. (दि. २९/०८/२०२२ रोजी पर्यत) अमृतधाम सोसायटी, निरंकारी भवनजवळ, विजयनगर, रहाटणी, काळेवाडी, पिं.चिं. पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | २९/०९/२०२२ रोजी १६.०९ वा |
| फिर्यादी | :- | कुटटन नानु नायर, वय ५३ वर्षे, रा.ठी. अमृतधाम सोसायटी, फ्लॅट नं. बी/८, सर्व्हे नं. १०८/१/१, निरंकारी भवनजवळ, विजयनगर, रहाटणी, काळेवाडी, पिं.चिं. पुणे. |
| आरोपी | :- | आनंद डेव्हलोपर्सचे विकासक १)राजेंद्र अनंतकुमार बिजलानी व २)भागीदार महिला आरोपी, रा. फ्लॅट नं. २, प्लॉट नं. १६३, अनिष कॉम्प्लेक्स, पिंपरी, पिं.चिं. पुणे |

**अटक नाही.**

तपशिल :- आरोपीत आनंद डेव्हलोपर्सचे विकासक यांनी संगनमताने, त्यांचे मालकीचे भागीदारीतील आनंद डेव्हलोपर्समार्फत अमृतधाम सोसायटी, निरंकारी भवनजवळ, विजयनगर, रहाटणी, काळेवाडी, पिं.चिं. पुणे या सोसायटीबाबत असलेल्या जबाबदारीचे उल्लंघन करुन, नकाशे व तपशील जाहीर केल्यानंतर फ्लॅटस घेणेस कबुल असलेल्या व्यक्तींच्या संमतीशिवाय, त्यात फेरफार किंवा बदल, वाढ करुन, प्रवर्तकाने सहकारी संस्था किंवा कंपनी स्थापन करणेसाठी कंपनी म्हणुन निबंधकांकडे संस्था नोंदणी करणेसाठी अर्ज केला नाही, तसेच सोसायटीची स्थापना न करता, सदस्यांकडे जमीनीतील व इमारतीतील हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांचे हस्तांतर केले नाही किंवा तसे दस्तऐवज अद्याप करुन दिले नसलेने सर्व सभासदांची वरीलप्रमाणे फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि. एस. एस. जाधव, ९६५३३०६१५६

१५.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ४३६/२०२२ भा.द.वी.कलम ३६५,३४२,३२४,५०४,५०६,५०७,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २९/०९/२०२२ रोजी १५.३० वाजातचे सुमारास ओमकांर कॉलनी, पार्क बी-१,फ्लॅट नंबर -१, पिंपळे निलख,पुणे येथे व सर्वे नंबर-६, लक्ष्मीकृपा बंगला, क्रांतीनगर, पिंपळे निलख,पुणे येथे.

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी २३.१७ वा

फिर्यादी :- पीडीत महिला फिर्यादी वय ३० वर्षे

आरोपी :- १)महिला आरोपीत वय-४२ वर्षे
२)साहिल सुहास बालवडकर वय-२२ वर्षे दोन्ही रा.सर्वे नंबर-६,
लक्ष्मीकृपा बंगला, क्रांतीनगर, पिंपळे निलख, पुणे
३)महिला आरोपी वय-३९ वर्षे रा.धनलक्ष्मी हौसींग सोसायटी,फ्लॅट नंबर-११, विठ्ठलवाडी, सिंहगड रोड,पुणे-११

**सदर आरोपींना सी.आर.पी.सी. ४१ (अ)(१) प्रमाणे समजपत्र देवुन गुन्ह्यातील पुढील कार्यवाहीकामी हजर राहण्याची समज देण्यात आली आहे.**

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी संगणमत करुन फिर्यादीला आ.क्र.१ हिचे पती सुहास बालवडकर याचे सोबत फिरते असा संशय घेवुन या कारणावरुन आ.क्र.१ व आ.क्र.३ यांनी हाताने मारहाण करुन केस ओढुन, गैरपणे जबरदस्तीने त्यांचे पांढऱ्या रंगाची फॉर्च्युनर गाडी क्रमांक एम.एच.१४ ई.यु.६८८६ यात बसवुन आरोपीत २ यांनी त्यांचे ताब्यातील गाडी चालवत आ.क्र.१ यांचे घरी रा.सर्वे नंबर-६,लक्ष्मीकृपा बंगला, क्रांतीनगर,पिंपळे निलख,पुणे येथे नेऊन आ.क्र.१ आ.क्र.३ यांनी फिर्यादीला गाडीतुन खाली उतरवुन फिर्यादीचे दोन्ही हात धरुन ओढत घरामध्ये नेऊन, डांबुन ठेवुन आ.क्र.१ यांनी जमीनीवर पाडुन खाली दाबुन धरुन अंगावर बसुन बुटाने मारहाण करुन व आ.क्र.३ यांनी हाताने मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी केली.तसेच आ.क्र.३ याने फिर्यादीचे पती रोहन मते यांना फोनवर शिवीगाळ केली.त्यानंतर पती रोहन मते हे सांगवी येथील पोलीसांना आ.क्र.१ यांचे घरी घेवुन आले व पोलीसांनी तेथुन सुटका केली.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि एस.एस. खलाटे, ९५५२५३३५११

१६.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी ४२४/२०२२ भा.द वि कलम ३९२

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २८/०९/२०२२ रोजी २०/४५ वा.चे सुमारास द्वारका सोसायटीच्या थोडे पुढे रॉयल चायनीज समोर, चोविसावाडी, चऱ्होली ता.हवेली जि.पुणे

गुन्हा दाखल :- २९/०९/२०२२ रोजी २१.०२ वा.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय २४ वर्षे |
| आरोपी | :- | एक काळया रंगाची पल्सर मोटार सायकल त्यावर एक काळया रंगाचा जॅकेट व काळया रंगाचा हेल्मेट घातलेला, अंगाने मध्यम असलेला अनोळखी इसम.<br>**अटक नाही.** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी ठिकाणी द्वारका सोसायटीच्या थोडे पुढे रॉयल चायनीज समोर, चोविसावाडी, चऱ्होली ता.हवेली जि.पुणे येथे फिर्यादीचे गळयातील २५,०००/- रु.किं.चे एक तोळे वजनाचे ० सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसका मारुन ओढुन तोडुन चोरुन नेले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि भंडारे ९९२३८३३००७ |